नि. फौ. ख. क्र.१९४/२०१७ निशाणी क्र. २५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – जाकीर हुसेन शे. अहमद

वय – ५० वर्षे व्यवसाय – मजुरी,

पत्ता – रा. सलाम नगर, अकोट फाईल, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. शे. अहमद गुलाम नबी हे माझे वडील आहेत. आमची शेती पारस येथे गोपाल खंडारे यांच्या शेतीच्या बाजूला आहे. दि.१६.०७.२०१७ रोजी दुपारी मी माझ्या शेतामध्ये होतो, त्यावेळी गोपाल खंडारे व माझ्या वडीलांमध्ये बोलाचाल झाली होती. सदर बोलाचाल ही आमच्या शेताच्या मध्ये असलेल्या धुरा तोडण्याच्या कारणावरुन झाली होती. सदर घटनेबाबतचा रिपोर्ट माझ्या वडीलांनी दिला होता.

**(साक्षीदार अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नसल्याकारणाने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१६.०७.२०१७ रोजी आमच्या शेताच्या बाजूस असलेल्या शेतमालक गोपाल खंडारे यांनी शेती वहितीकरीता बैलजोडी भाड्याने बोलाविली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या शेताचा उत्तरेकडील बाजूस असलेला धुरा सदर बैलामार्फत गोपाल खंडारे याने तोडला होता, त्यामुळे आमच्या शेतात असलेल्या सोयाबीन पिकाचे नुकसान झाले होते, त्यामुळे माझ्या वडीलांनी गोपाल खंडारे यास आमच्या शेतातून बैलगाडी घेवून जाऊ नको असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी गोपाल खंडारे, अश्वील खंडारे व रवी खंडारे त्या ठिकाणी आले व त्यांनी माझ्या वडीलांना अश्लील शिवीगाळ केली तसेच गोपाल खंडारे याने माझ्या वडीलांस थापडाबुक्कांनी मारहाण केली. सदर घटनेच्यावेळी मी तेथे होतो. मी आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी क्र.१ ते ३ आज न्यायालयात गैरहजर त्यांच्या ओळखीबाबत कोणताही वाद उपस्थीत नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

३. पोलीसांनी माझा जबाब नोंद करुन घेतला नव्हता. आज मी माझ्या सरतपासादरम्यान सांगितलेला मजकूर यापुर्वी कोणालाही सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.०७.२०१७ रोजी दुपारी मी माझ्या शेतामध्ये होतो, हा मजकूर खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेविषयी मला काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आज न्यायालयात जे वाचून दाखविले ते मी सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १२.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.12 15:03:21 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १२/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १२/०२/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १२/०२/२०२६ |